एलनोर रूझवेल्ट


आणि भीतीदायक तळघर

पीटर मर्चेंट, मराठी : अश्विनी बर्वे



एलनोर रूझवेल्ट

आणि भीतीदायक तळघर



पीटर मर्चेंट, चित्र : अन्ना डिविटो

मराठी : अश्विनी बर्वे

जेव्हा ती छोटी मुलगी होती, तेव्हा एलनोर रूझवेल्ट प्रत्येक गोष्टीला घाबरत होती.





तिला कधीही ती स्वतः सुरक्षित आहे असं वाटलं नाही. एलनोर खूप गोष्टींना घाबरत होती.


एलनोर नावेला घाबरत असे.
तिला पाण्यात पडण्याची भीती वाटे.



ती उंदरांना घाबरे.

ती घोड्यांना घाबरे.

ती लुटारूंना घाबरत असे.





पण सगळ्यात जास्त एलनोर अंधाराला घाबरत असे.ही एक मोठी समस्या होती, कारण ती एका खूप अंधाऱ्या घरात राहत होती.



तरीपण, एलनोरला तिचं घर आवडत होतं. तिची काकू एडिथपण तिथं राहत होती. एलनोरचे, एडिथकाकू वर प्रेम होतं आणि तिला काकूला खुश करायला आवडे.


एका रात्री सगळेजण झोपल्यानंतर,
एलनोरच्या काकूने तिला बोलावलं.
“एलनोर!” ती अंधारात ओरडली.
“ऐक,एलनोर!”



एलनोरने आपले डोळे उघडले.तिला आपल्या अंथरुणातून उठू वाटत नव्हते.पण ती आपल्या काकुकडे दुर्लक्ष करू शकत नव्हती. तिला माहित होतं तिने काय करायला हवं आहे ते.



एलनोर अंधारात खूप हळूहळू
चालत एडिथ काकुच्या
खोलीपर्यंत पोहचली..



तिथं अंधाऱ्या खोलीत तिची प्रेमळ काकू झोपली होती.ती खूप आजारी वाटत होती..

"एलनोर," ती कर्कश आवाजात म्हणाली.

“तू माझ्यासाठी बर्फ आणू शकशील का?” माझ्या गळ्यात खूप दुखत आहे. थोडेसे बर्फाचे पाणी माझ्या वेदना शांत करतील.”

ते ऐकून एलेनोर जागीच थांबली.एलेनोर आपल्या काकुसाठी बर्फ कसा आणू शकणार होती?

बर्फ आणायला खाली जावं लागणार होतं.

घरातल्या सगळ्यात अंधाऱ्या खोलीत-खाली तळघरात!







पण एलनोरचे आपल्या काकूवर खूप प्रेम होते. तिला काकूला मदत करायची होती.एलेनोरने दीर्घ श्वास घेत एक मेणबत्ती पेटवली. मग तिने बर्फाची बदली उचलली आणि हॉलमध्ये खाली आली

जेव्हा ती तळघराच्या दरवाज्यापाशी पोहचली, तेव्हा एलनोर थांबली. तिला वाटलं की तिने काहीतरी गोंधळ ऐकला आहे- आणि त्या गोंधळाचा आवाज तळघरातून येत होता. परत फिरायचं का? पण मग काकू काय म्हणेल?



हळहळू एलनोरने तळघराचा दरवाजा उघडला. तिथं धुप्प अंधार होता. तिला परत फिरावं वाटत होतं. पण तिचं हृदय जोरात धडधड करत होतं. ती पायऱ्यावरून खाली घसरली.





खालच्या जिन्यावरून एलनोरने अजून एक खरडण्याचा आवाज ऐकला. यावेळी, तिला माहित होतं की हा आवाज खरा होता. तिने आपली मेणबत्ती तिकडे केली. आणि तिकडे खाली काही पाहिलं:

एक उंदीर!

उंदीर एका झटक्यात फरशीवर पडला, मग ती एका कोपऱ्यात जाऊन लपली आणि त्यामुळे तो नजरेच्या बाहेर गेला.





एलनोरने एक दीर्घ श्वास घेतला. आता ती तळघरात येवून पोहचली होती.तिला थोडासा बर्फ घेवून जायचा होता. पण आता तिच्यासमोर एक नवीन समस्य होती. तिला हे माहित नव्हतं की आईसबॉक्स कुठे ठेवला आहे.

बिलकुलच नाही आणि तळघरात ठार अंधार होता.

हळूहळू, एलनोर तळघरात गेली. तिथं तिने एक छोटा दरवाजा बघितला तो एका फटी सारखा होता. तिला दरवाज्याच्या समोर उभं राहिल्यावर अचानक थंड वाटलं. तिथं कोणी होतं का ?







एलनोरला तिथून पळून जावंसं वाटत होतं, पण आता ती बर्फाशिवाय जावू शकत नव्हती. अजून एक दीर्घ श्वास घेत तिने त्या छोट्या खोलीचा दरवाजा उघडला.

बर्फाचा बॉक्स





जसा तिने आइसबॉक्स उघडला, एलनोरला आपल्या चेहऱ्यावर काहीतरी चिकटचिकट आहे असं वाटलं. “कोळी!” एलनोर ओरडली.

जसं तिने कोळ्याचं जाळं साफ करायला
सुरुवात केली,तिच्या हातातली बादली
आणि मेणबत्ती पडली.





आता तिथं पहिल्यापेक्षा अधिक दाट अंधार झाला होता. पण एलनोर पळाली नाही. आता ती इतकी दूर आली होती, आणि तिच्या काकूला बर्फाची गरज होती. तिच्याजवळ करण्यासारखं फक्त एकच काम होतं.तिने बदली उचलली आणि त्यात बर्फ टाकला.

तळघराच्या दरवाज्यात परत जातांना एलनोर काही वस्तूंना धडकली. तिचं हृदय थरथरलं. पण ती बर्फाची एक पूर्ण बदली घेवूनच तळघरातून बाहेर पडली.



मग हसत एलनोर पायऱ्यावरून उड्या मारत, काकुच्या खोलीत गेली.





"एलनोर!“ तिची काकू म्हणाली. “मला तुझी काळजी वाटत होती. अंधार खूप भीतीदायक असू शकतो.”

“हो," एलनोर म्हणाली. "पण तुम्ही माझी चिंता करू नका. मी ठीक आहे.”

एलनोरने अभिमानाने काकूला बर्फाची बादली दिली.

त्या रात्रीनंतर एलनोरची भीती थोडीशी कमी झाली. त्यानंतर पूर्ण जीवनभर एलनोरने नेहमीच आपल्या भीतीचा धीराने सामना केला..





एलनोर रूझवेल्ट मोठी झाल्यावर हिरो झाली.तिने आपल्या भीतीवर विजय मिळवला आणि एक प्रसिद्ध सार्वजनिक वक्ता आणि प्रथम एक साहसी महिला झाली. एलनोरने कधीही आपल्या भीतीला दुसऱ्यांना मदत करण्याच्या कामात येवू दिलं नाही.

एलनोर रूझवेल्टच्या जीवनाची सनावली

१८८४ एलनोर रूझवेल्टचा जन्म न्यूयॉर्क शहरात झाला.

१८९२ एलनोरच्या आईचे निधन,एलनोर आपल्या आजी बरोबर राहिली.

१८९४ एलनोरच्या वडिलांचे निधन

१८९९ एलनोरला इंग्लडच्या बोर्डिंगमध्ये पाठवलं.

१९०५ एलनोर न्यूयॉर्क शहरात भावी राष्ट्रपती फ्रैंकलिन रूझवेल्टबरोबर लग्न केलं.

१९२० एलनोर महिलांना मत देण्याचा अधिकार आहे,त्यासाठीच्या संघटनेत समर्पित.

लीग ऑफ वीमेन वोटर्स मध्ये शामिल झाली.

१९२४ एलनोरने डेमोक्रेटिक नॅशनल कन्वेंशन मध्ये मुख्य भाषण दिलं.

१९३२ एलनोर अमेरिकेची "फर्स्ट-लेडी“ झाली.

१९३३ एलनोरने महिला पत्रकारांसाठी व्हाइट हाउस प्रेस कॉन्फ्रेंसची सुरुवात केली. एलनोर ग़रीब, महिला आणि आफ्रिकी अमेरिकन यांची चैंपियन झाली.

१९३९ एलनोरने वंशवाद विरोधात अमेरिकी “क्रांतिच्या मुली” मधून राजीनामा दिला.

१९४५ फ्रैंकलिन रूझवेल्टचे निधन; द्‌वितीय विश्व युद्ध समाप्त

१९४६ एलनोरला संयुक्त राष्ट्रामध्ये पहिल्या अमेरिकी प्रतिनिधी मध्ये सामील होण्यासाठी आमंत्रित केले गेले.

१९४८ एलनोरने संयुक्त राष्ट्राच्या मानवधिकाराची सार्वभौम घोषणा पारित करण्यासाठी मदत केली.

१९६२ एलनोर रूझवेल्टचा एका स्ट्रोक मध्ये मृत्त्यू झाला.

समाप्त